रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २०
www.ramprahar.com

रविवार, ६ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग

खारघरमध्ये ट्रॅफिक सिग्नल उभारणीचा शुभारंभ/२

रविवारनिमित्त विविध विषयांवरील लेख/४

पनवेल परिसरातील शाळा, महाविद्यालयांमध्ये उपक्रम/५

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर होणार आणखी दोन लेन



**मुंबई :** मुंबई-पुणे प्रवास आता आणखी सुलभ होणार आहे. या द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी आणि अपघात आता काही प्रमाणात थांबण्याची शक्यता आहे. आता या मार्गावर दोन लेन वाढवण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) द्रुतगती मार्गावरच्या दोन्ही बाजूंच्या प्रत्येकी एक लेन वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसा प्रस्तावदेखील तयार केला आहे. त्यामुळे प्रवाशांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे. या मार्गाला मंजुरी मिळताच अतिरिक्त दोन लेन बांधण्यास सुरुवात होणार आहे. यासाठी सुमारे पाच हजार कोटींचा खर्च अपेक्षित असल्याचे एमएसआरडीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले आहे. दोन नवीन लेन तयार झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होईल, शिवाय प्रवासही वेगवान होणार आहे.

### मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडून मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी

# गणेशोत्सवापूर्वी एक मार्गिका होणार पूर्ण





**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणाच्या भविष्याची दिशा ठरविणाऱ्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी शनिवारी (दि. ५) मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठणे ते पनवेलपर्यंतच्या रस्त्याची अधिकाऱ्यांसह पाहणी करून आढावा घेतला. या वेळी मंत्री चव्हाण यांनी मुंबई-गोवा महामार्गावरील एक मार्गिका गणेशोत्सवापूर्वी पूर्ण होऊन सुरू होईल, तर डिसेंबर २०२३अखेरपर्यंत पूर्ण महामार्ग सुरळीतपणे सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला.

या पाहणी वेळी भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, दक्षिण जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, राष्ट्रीय महामार्गाचे आरो अंशुमन श्रीवास्तव, मुख्य अभियंता संतोष शेलार, सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबागचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे तसेच इतर शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, मुंबई-गोवा महामार्गाची भौगोलिक परिस्थिती खूप वेगळी आहे. पाऊस खूप पडत असल्याने पावसामध्ये रस्त्याचे काम करता येत नाही. सध्या पावसाचे प्रमाण कमी झाले असून सिमेंट ट्रीटेड बेस या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रस्त्याचे काम सुरू आहे. त्यामुळे गणेशोत्सवापूर्वी एक मार्गिकाचे काम पूर्ण होऊन ती सुरू होईल. हे झाल्यावर कोकणात गणेशोत्सवासाठी येणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास सुखकर होईल.

मंत्री चव्हाण यांनी नागोठणे येथील वाकण फाटा येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून हे काम कोणत्याही परिस्थितीत गणेशोत्सवापूर्वी करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या. सध्या पावसाळ्यात महामार्गाचे काम हे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून सुरू आहे. यामध्ये हलगर्जीपणा नको तसेच रस्त्याचे काम गुणवत्तापूर्ण करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.



### विविध परवानग्यांची कार्यवाही पूर्ण

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामासाठी असलेल्या वनविभाग, भूसंपादन, न्यायलयीन प्रक्रिया व अन्य बाबींच्या परवानग्यांची कार्यवाही पूर्ण झाली असून येत्या डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे मंत्री रवींद्र चव्हाण यांनी या वेळी सांगितले. मंत्री चव्हाण यांनी पेण तालुक्यातील जिते गावाच्या हद्दीत सुरू असलेल्या महामार्गाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली.

(अधिक छायाचित्रे पान ३ व ८ वर..)



# लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रांतील लोकप्रिय नेतृत्व असलेले कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त मोठ्या प्रमाणात सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले होते. विविध स्तरांतील मान्यवरांनी तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, हितचिंतकांनी कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांना शनिवारी (दि. ५) वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन अभीष्टचिंतन केले.

सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले क्रियाशील आमदार प्रशांत ठाकूर यांचा ४९वा वाढदिवस होता. त्यांच्याबद्दल लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत कायम आदर पहायला मिळतो. आपल्या विधायक कार्यातून त्यांनी अफाट लोकप्रियता प्राप्त केली आहे. सलग तीनवेळा आमदार होऊनसुद्धा त्यांच्या वर्तनात कधीही बडेजाव दिसत नाही. त्यामुळे त्यांचे लाखोंच्या संख्येने हितचिंतक आहेत. त्या अनुषंगाने वाढदिवसानिमित्त राज्यभरातून सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, राजकीय, कला, सांस्कृतिक, वैद्यकीय, विधीज्ञ, पोलीस, शासकीय अधिकारी, पत्रकारिता, विविध संस्था, संघटना, निरनिराळ्या पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी, हितचिंतकांनी त्यांचे अभीष्टचिंतन केले.

वाढदिवसाला पुष्पगुच्छ, भेटवस्तू तसेच बॅनरद्वारे शुभेच्छा दिल्या जातात. तसे न करता सामाजिक सेवाकार्यात योगदान द्यावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले होते. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नादब्रह्म साधना मंडळ खारघर व पनवेल तालुका सांस्कृतिक सेलच्या विद्यमाने पनवेलमध्ये शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन कार्यक्रम, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व बॅडमिंटन असोसिएशन ऑफ रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने रामशेठ ठाकूर बॅडमिंटन ट्रॉफी स्पर्धा, सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्या जाणीव एक सामाजिक संस्थेच्या वतीने फडके नाट्यगृहात गीतरामायण कार्यक्रम, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे यांच्या रत्नदीप स्पोर्ट्स क्लबच्या वतीने धाकटा खांदा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व ज्येष्ठ नागरिकांना छत्रीवाटप, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांच्या उत्कर्ष सांस्कृतिक कला क्रीडा मंडळाच्या वतीने पोदी येथे आयुष्यमान भारत कार्ड, श्रमकार्ड तसेच पाच वर्षापर्यंतच्या बालकांचे आधार कार्ड बनवणे व वाटप युवा नेते केदार भगत यांच्या वतीने लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय साहित्यवाटप, माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा यांच्यातर्फे खारघरमध्ये गरीब नागरिकांना अल्पोहार तसेच आसुडगाव येथील गोशाळेत गायींना चारा वाटप, गोपीनाथ भगत सामाजिक विकास मंडळाच्या वतीने कामोठे येथे मोफत ई-सेवा सुविधा शिबिर, माजी नगरसेवक अमर पाटील यांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्रंथतुला, सेवा सन्मानिमित्त सफाई कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा असे विविध सामाजिक उपक्रम अनेक ठिकाणी आयोजित करण्यात आले. (पान २ वर..)



### मान्यवरांकडून शुभेच्छा

अभ्यासू, कार्यतत्पर, आमदार प्रशांत ठाकूर यांचे वाढदिवसानिमित्त राज्यभरातील अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्यासह विधिमंडळातील लोकप्रतिनिधी यांनीही शुभेच्छा दिल्या.



■ वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे वृत्त पान २, ५, ७ वर..

## निवडक

### पाकचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना शिक्षा व अटक

**लाहोर :** पाकिस्तानचे माजी पंतप्रधान तथा पाकिस्तान-तहरिक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाचे अध्यक्ष इम्रान खान यांना भ्रष्टाचार (तोषखाना) प्रकरणात जिल्हा सत्र न्यायालयाने तीन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. यानंतर त्यांना अटक करण्यात आली. न्यायालयाने खान यांना एक लाख रुपयांचा दंड ठोठावला असून पाच वर्ष निवडणूक लढण्यास बंदी घातली आहे.

### भिवंडीत 'एनआयए'चा छापा; दहशतवाद्यांचा कॅशिअर ताब्यात

**भिवंडी :** राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआए) पथकाने भिवंडीतील पडघा येथे शनिवारी (दि. ५) छापा टाकून पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणा आयएसआयशी संबध असल्याप्रकरणी अकीब नाचन याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्याने दहशतवाद्यांना आर्थिक रसद पुरविल्याचा आरोप आहे.

### मुंबई कोविड घोटाळा प्रकरण

# माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्याविरोधात गुन्हा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या कोविड घोटाळा प्रकरणात माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पेडणेकर यांच्यासह महापालिकेच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांवर मुंबईतील आग्रीपाडा पोलीस ठाण्यात या गुन्ह्याची नोंद झाली आहे.

मुंबई महापालिकेने कोरोना महामारीत कोट्यवधींचा घोटाळा केला आहे. कोविड काळात काढण्यात आलेल्या टेंडर प्रक्रियेत घोटाळा झाल्याचे ईडीचे म्हणणे आहे. यात तत्कालीन महापौर किशोरी पेडणेकर यांचा सहभाग आहे, असाही ईडीचा आरोप आहे. या प्रकरणात मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने कलम ४२० आणि कलम १२० ब अंतर्गत पेडणेकरांवर गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.



मुंबईत मृत कोविड रुग्णांना वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणारी बॉडी बॅग (मृतदेह बॅग) दोन हजारांऐवजी ६८०० रुपयांना खरेदी केल्याचे ईडीने म्हटले आहे. हे कंत्राट तत्कालीन महापौरांच्या सूचनेनुसार देण्यात आल्याचे ईडीने म्हटले आहे. कोविड काळात किशोरी पेडणेकर याच मुंबईच्या महापौर होत्या.

### गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज पुण्यात पोर्टलचे लॉचिंग

**पुणे : प्रतिनिधी**

देशाचे गृहमंत्री अमित शाह पुणे दौऱ्यावर असून त्यांच्या हस्ते रविवारी (दि. ६) केंद्रीय सहकार संस्थेने निर्माण केलेले पोर्टल लॉंच करण्यात येणार आहेत. पिंपरी चिंचवडमधील रामकृष्ण मोरे सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच लोकमान्य टिळक पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने पुण्यात येऊन गेले. त्यानंतर आता गृहमंत्री शाह पुणे दौऱ्यावर आहेत.

## राज्यातील ८६ टक्के पिकांना विम्याचे संरक्षण

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या एक रुपयात पीक विमा योजनेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. यंदा राज्यात खरीप हंगामात पेरलेल्या एक कोटी ३० लाख ६५ हजार २५७ हेक्टर क्षेत्रापैकी ८६ टक्के म्हणजे एक कोटी १२ लाख ४२ हजार ५६४ हेक्टरवरील पिकांचा विमा शेतकऱ्यांनी उतरवला आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा यासाठी कृषी विभागामार्फत प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पेरणी न होणे तसेच पूर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरीता विमा संरक्षण लाभणार आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली होती. काही ठिकाणी तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने राज्य शासनाने केंद्र सरकारकडे याबाबत विनंती केली असता पीक विमा ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी आणखी तीन दिवसांची मुदतवाढ देण्यात आली. ही वाढीव मुदत गुरुवारी संपली. गेल्या वर्षी ९६ लाख ६२ हजार २६१ शेतकऱ्यांनी पीक विमा उतरवला होता. त्या तुलनेत यंदा १७५ टक्के अधिक म्हणजे एक कोटी ६९ लाख ४८ हजार ७९० शेतकऱ्यांनी योजनेला प्रतिसाद दिला आहे.

# मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सवात सीकेटी कॉलेजची बाजी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या ५५व्या आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत फाईन आर्ट विभागामध्ये सर्वाधिक पारितोषिके प्राप्त करून सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले आणि आपली यशस्वी वाटचाल कायम राखली आहे.

मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवाची प्राथमिक फेरी मुंबई विभागात घेण्यात येते. प्राथमिक फेरीतील सर्व विजेत्या महाविद्यालयांची अंतिम फेरी मुंबई विद्यापीठात होते. फाईन आर्ट या विभागाची अंतिम फेरी एकूण आठ कला प्रकारांमध्ये घेण्यात आली. यात सीकेटी महाविद्यालयीने सर्वाधिक पारितोषिके प्राप्त करून ओव्हरऑल चॅम्पियनशिप जिंकत वर्चस्व प्रस्थापित केले.

इन्स्टॉलेशन स्पर्धेत रोहित देशमुख व टीमने प्रथम क्रमांक, शिल्प कलेत नितेश मानकामे द्वितीय, कार्टुनिंगमध्ये ऋतुजा पाटील द्वितीय, चित्रकलेत रोहित ढोबळे तृतीय आणि कोलाज स्पर्धेत शाहू सालगरे याने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

### सांस्कृतिक स्पर्धेतील फाईन आर्ट विभागाची चॅम्पियनशिप पटकावली

विजेते विद्यार्थी, महाविद्यालयाचा सांस्कृतिक चमू व विभाग प्रमुख डॉ. गितीका तन्वर, समन्वयक गणेश जगताप यांचे या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, अनिल भगत, परेश ठाकूर, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के.पाटील, प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकवर्ग यांनी अभिनंदन केले.

## ५०८ रेल्वेस्थानकांचा होणार पुनर्विकास

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रेल्वे मंत्रालयाने अमृत भारत योजनेतून देशातील एक हजार ३०९ रेल्वेस्थानकांचा कायापालट करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत सुरुवातीला ५०८ रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकासाचे भूमिपूजन रविवारी (दि. ६) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे.



**पंतप्रधान मोदींच्या हस्ते आज भूमिपूजन**

देशात वाहतुकीसाठी रेल्वे हे नागरिकांच्या पसंतीचे साधन आहे. त्यामुळे रेल्वेस्थानकांवर जागतिक दर्जाच्या सुविधा देण्यात येणार आहेत. यात रेल्वेस्थानकांवर प्रतीक्षा कक्ष, शौचालये, स्थानिक उत्पादन विक्री, मोफत वाय फाय, एक स्टेशन एक उत्पादन, परिसर सुशोभीकरण, वाहतूक सुधारणा आदी कामे होणार आहेत. पंतप्रधान मोदी दूरदृष्यप्रणालीद्वारे ५०८ रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकास कामांची पायाभरणी करतील. यामध्ये महाराष्ट्रातील ४४ रेल्वेस्थानकांचा समावेश आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सेवाभावी उपक्रम

## खारघरमध्ये आभा कार्ड नोंदणी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खारघरमध्ये श्री साई गणेश मंदिर ट्रस्ट आणि पनवेल महापालिकेच्या माजी सभापती संजना समीर कदम यांच्या माध्यमातून मोफत आभा कार्ड रजिस्ट्रेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल संजना कदम आणि समीर कदम यांचे कौतुक केले.

खारघर सेक्टर १६, वास्तूविहार येथील श्री साई गणेश मंदिरामध्ये मोफत आभा कार्ड रजिस्ट्रेशन शिबिर आयोजित केले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्यसाधून आयोजित केलेल्या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी प्रभाग समिती सभापती संजना समीर कदम, भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस समीर कदम, संतोष शर्मा, संजय बांगर, अमर उपाध्याय, सर्जेराव मेंगाणे, रामचंद्र पाटील, विश्वनाथ दिंडी, योगेश जोशी, सुशांत पाटोळे, मयूर तायडे, अमित बोधाई, स्नेहल बोदाई, निलम विसपुते, मुसरत अन्सारी, आशिष नागरगोजे आदी उपस्थित होते.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख व पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, बॅनरबॅजी न करता समाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन पदाधिकारी, कार्यकर्त्यांना करण्यात आले होते. त्या अनुषंगाने आवाहनाला प्रतिसाद देत पनवेलसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. याचप्रमाणे विविध कामांचा शुभारंभही आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून करण्यात आला. या उपक्रमांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर व अन्य मान्यवरांनी भेट देत उपक्रमांचे कौतुक केले.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आभा कार्ड शिबिराचा ११० जणांनी, श्रम कार्ड शिबिराचा ३० जणांनी आणि आधार कार्ड अपडेटचा ५५ जणांनी लाभ घेतला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते लाभार्थ्यांना कार्डचे वाटप करण्यात आले. माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या उपक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, राकेश भुजबळ, मयूर कदम, सुनंदा भुजबळ, प्रीती भुजबळ, सुरेखा भुजबळ, अश्विनी भुजबळ, नितीन भुजबळ, अजित लोंढे, किशोर शिंदे, चंद्रकांत पट्टेबहाद्दूर आदी भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**

## विशेष तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात येत आहे. याअंतर्गत पनवेल महापालिका दवाखानाच्या वतीने विशेष तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवेचा शुभारंभ खारघरमधील आरोग्य केंद्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून करण्यात आला आहे. हा कार्यक्रम पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी त्यांच्या हस्ते सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला.

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील आरोग्यकेंद्रात तज्ज्ञ डॉक्टर उपचारासाठी उपलब्ध झाले आहेत. यामध्ये भिषक, बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, यांच्या सेवा आठवड्यातून एक दिवस तर त्वचारोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, कान-घसा-नाक तज्ज्ञ, मनोविकार तज्ज्ञ यांच्या पंधरा दिवसातून एकदा सेवा देण्यात येणार आहे. सर्वसामान्य नागरिक दिवसभर काम करून संध्याकाळी दवाखान्यात येत असतात, हे लक्षात घेऊन महापालिकेने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सकाळच्या ओपीडीबरेबरच दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत ओपीडी सुरू करुन आरोग्य सेवा देण्याचा अत्यंत स्तुत्य उपक्रम राबविला आहे. याबरोबरच महापालिकेने वैद्यकिय आरोग्य सेवा बळकट करत पुढचे पाऊल टाकले आहे.

यामध्ये डॉ. लक्ष्मण वाघमारे, डॉ. सुतेशा बांमगुडे हे प्रत्येक मंगळवारी, डॉ. हरविंदर सिंग प्रत्येक गुरुवारी, डॉ. रुमिता सिंग महिन्याच्या पहिला आणि तिसऱ्या गुरुवारी तसेच डॉ. राहुल भातंभरे महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या शनिवारी सेवा देणार आहेत.

या वेळी माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, हरेश केणी, प्रवीण पाटील, शत्रुघन काकडे, निलेश बाविस्कर, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, भाजपचे खारघर शहर सरचिटणीस कीर्ती नवघरे, किरण पाटील, अमर उपाध्याय, सचिन पवार यांच्यासह पदाधिकारी, महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.



## खारघर सेक्टर १५मध्ये ट्रॅफिक सिग्नल उभारणीचा शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खारघर सेक्टर १५ येथील घरकुल स्पगेटी चौक येथे ट्रॅफिक सिग्नलच्या कामाचा शुभारंभ पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

खारघर शहर वसविताना सिडकोने अनबेक नागरी समस्यांपासून रहिवाश्यांना वंचित ठेवले होते. त्यातच खारघर वसाहतीमध्ये वाहतूक कोंडीची समस्या नागरिकांना भेडसावत होती. या समस्येबाबात माजी नगरसेवक निलेश बावीस्कर यांनी महापालिकेकडे पाठपुरावा सुरू केला होता. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून खारघर सेक्टर १५ घरकुल स्पगेटी चौक येथे ट्राफीक सिग्नल उभारण्यात येणार आहे.

या सिग्नल उभारण्याच्या कामाचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्यसाधून माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, नरेश ठाकूर, शत्रृघ्न काकडे, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, समीर कदम, अमर उपाध्याय, किरण पाटील, घरकुल वसाहती अध्यक्षा कंचन बिर्ला आदी उपस्थित होते.

## 'सीकेटी'च्या पालक शिक्षक संघाची कार्यकारिणी जाहीर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर माध्यमिक विद्यालयाच्या मराठी माध्यमिक विभागामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पालक शिक्षकाची कार्यकारिणी निवड सभा विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे व पर्यवेक्षक कैलास म्हात्रे याच्या मार्गदर्शनाने झाली.

कार्यकारिणी समितीमध्ये अध्यक्षपदी मुख्याध्यापक कैलास सत्रे, उपाध्यक्षपदी पालक राजन कोळी, सचिवपदी शिक्षिका ज्योती पाटील, सहसचिवपदी पालक सुषमा कोळी, कार्यालयीन सुवर्णा चौधरी यांची निवड झाली आहे. कार्यकारिणी समितीमध्ये नियुक्त झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व वर्गाचे पालक प्रतिनिधी व सर्व शिक्षकवृंद सदर सभेसाठी उपस्थित होते.

### राज्यस्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धा

## खांदा कॉलनीतील खेळाडूंचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती संभाजी नगर येथे २९ व ३० जुलै २०२३ रोजी राज्यस्तरीय थाईबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन थाईबॉक्सिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने करण्यात आले होते. यात राज्यातील ४५० खेळाडूंनी सहभाग घेतलेला. यामध्ये रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत खांदा कॉलनीतील खेळाडूंनी एक सुवर्णपदक आणि एक कांस्यपदक पटकावले. पदक विजेत्या खेळाडूंमध्ये कनिष भोईर याला १२ वर्षाखालील ४४ किलो खलील वजनगट सुवर्णपदक, सिद्धी टेमकर हिला १४ वर्षाखालील ४८ किलोखालील वजनगट कांस्यपदक तर अद्वैत गांगुर्डे याने १२ वर्षाखालील ३२ किलो वजनगट सहभाग घेतला होता.

खेळाडूंची ओडिशा येथे होणाऱ्या राष्ट्रीय थाईबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे हे खेळाडू युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाच्या खांदा कॉलनी शाखेत सेन्सई प्रतिक ज. कारंडे यांच्याकडे कराटे आणि इतर मार्शल आर्टस्चे प्रशिक्षण घेत आहेत. या खेळाडूंचे युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष आणि थाईबॉक्सिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे चेअरमन डॉ. मंदार पनवेलकर, अध्यक्ष फरहान नबीजी सर, सचिव सागर कोळी यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## रायगड, नवी मुंबईतील तायक्वान्डो खेळाडूंसाठी आज कलर बेल्ट परीक्षा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड तायक्वांडो असोसिएशन या एकमेव अधिकृत जिल्हा तायक्वॉन्डो खेळाच्या संघटनेद्वारा रायगड व नवी मुंबई जिल्ह्यातील तायक्वान्डो खेळाडूच्या कलर बेल्ट परीक्षेचे रविवारी (दि. ६) न्यू होरिजन पब्लिक स्कूल, खांदा कॉलनी येथे करण्यात आले आहे.

रायगड तायक्वान्डो असोसिएशन ही एकमेव अधिकृत जिल्हा संघटना आहे व या संघटनेला भारत सरकार, भारतीय ऑलिम्पिक, स्पोर्ट्स ऑथोरिटी ऑफ इंडिया, तायक्वान्डो फेडरेशन ऑफ इंडिया, तायक्वान्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) याची मान्यता आहे. ही संस्था गेल्या अनेक वर्षापासून रायगड व नवी मुंबई विभागात तायक्वोंन्डो या खेळाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षण देत आहे व आतापर्यंत अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू या संस्थेने घडविले आहेत.

या परीक्षसाठी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा क्रीडा अधिकारी (रायगड)रवींद्र नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी (नवी मुंबई) रेवप्पा गुरव, न्यू हॉरिजन पब्लिक स्कूलच्या प्रिन्सिपल अमिता दत्ता, सुधागड स्कूल, कळंबोलीचे प्रिन्सिपल राजेंद्र पालवे, सजीवनी इंटरनॅशनल स्कूल खारघरचे अनुराग पांडे, ग्लोबल पिल्लाई इंटरनॅशनल स्कूल खांदा कॉलनीचे प्रकाश नायर, सेंट झेवियर्स स्कूल नेरूळच्या मनीषा मॅडम आदी उपस्थित राहणार आहेत.

या परीक्षा आंतरराष्ट्रीय पंच प्रशिक्षक सुभाष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहेत तसेच रायगड तायक्वांडो असोसिएशनचे सर्व प्रशिक्षक व ब्लॅक बेल्ट या परीक्षामध्ये निरीक्षक म्हणून काम करणार आहेत.

या परीक्षा सकाळी ८ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत होणार आहेत. दिवसभरात साधारण १००० खेळाडू परीक्षा देणार आहेत तसेच पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खळाडूचे सत्कार करण्यात येणार आहे, असे संस्थेचे सचिव सुभाष पाटील यांनी सांगितले.

पान १ वरून

## लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

लोकप्रतिनिधी म्हणून उत्कृष्ट काम करणारे, समाजाची जाण असलेले व्यक्तिमत्त्व आणि पक्ष संघटना जबाबदारी यशस्वीपणे बजावणे, पनवेल त्याचबरोबर जिल्हा किंवा जिल्ह्याबाहेर आलेल्या नैसर्गिक आपत्ती, आपत्कालीन परिस्थितीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर यांनी सढळ हस्ते मदत आणि धीर देण्याचे काम केले असल्याचे संपूर्ण महाराष्ट्राने पहिले आहे, मात्र हे कार्य त्यांनी कधीही सवंग लोकप्रियता किंवा प्रसिद्धीसाठी केले नाही. माणूस आणि माणुसकी म्हणूनच त्यांच्याकडून विधायक कार्य घडत आले आहे. सर्व क्षेत्रांत आमदार प्रशांत ठाकूर यांचे भरीव योगदान आहे. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वसा त्यांनी सांभाळला आहे. सतत सर्व समाजाच्या विकासाचा ध्यास घेऊन समाजाला कोणती गरज आहे हे लक्षात घेऊन ऊन, पावसाची तमा न बाळगता ते कार्य करीत असतात. त्यामुळे वाढदिवसानिमित्त कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अभीष्टचिंतनाचा वर्षाव झाला.







## विचुंबेत आज आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर तसेच भाजप युवा मोर्चा विचुंबे अध्यक्ष विवेक भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त विचुंबे भाजप, मंगलमूर्ती मित्र मंडळ, दुर्गामाता मित्र मंडळ आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ६) मोफत आरोग्य तपासणी आणि नेत्रतपासणी व चष्मेवाटप शिबिर आयोजित करण्यात आले आहे. आरजे शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व मेडीकव्हर हॉस्पिटल खारघर यांच्या सहकार्याने सकाळी ९ ते दुपारी ३पर्यंत विचुंबे येथील जिल्हा परिषद शाळेत हे शिबिर होणार आहे.

या शिबिरात डोळ्यांची मोफत तपासणी, मोफत चष्मेवाटप, मोतिबिंदूचे निदान, मोफत आरोग्य तपासणी यामध्ये ब्लड प्रेशर, शुगर टेस्ट, ईसीजी व कन्सलटंट केले जाणार आहे. त्याचप्रमाणे डोळ्यांच्या व्याधींवर कॅम्पमधील पेशंटसाठी ऑपरेशननंतर ३३ टक्के डिस्काउंट दिली जाणार आहे. या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम होत आहेत. त्या अंतर्गत विचुंबे येथे आरोग्य शिबिर, नेत्र तपासणी व चष्मेवाटप शिबिर घेण्यात आले आहे.

## सीकेटी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालय (ज्युनिअर कॉलेज) राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) वतीने शनिवारी (दि. ५) नागेश शिवलिंगेश्वर मंदिर येथे जास्वंद, मोगरा, गुलाब, तगर इ.२० फुलझाडे लावण्यात आली.

मंदिराचे पुजारी महाराज यांनी प्राचार्य प्रशांत मोरे व पर्यवेक्षक अजित सोनवणे यांच्या हस्ते फुलझाडांची विधिवत पूजा केली. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उत्तम आरोग्य व स्वास्थ्यासाठी ईश्वराची आराधना केल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ही फुलझाडे लावण्यात आली. या वेळी १७ विद्यार्थी स्वंयसेवक व शिक्षक उपस्थित होते.



# अभीष्टचिंतन





# आयुष्य भरभरून जगणारी स्मिता तळवलकर

**काही काही व्यक्तींच्या दिसण्यात, बोलण्यात, पाहण्यात, ऐकण्यात खरं तर एकूणच देहबोलीत ते आयुष्याच्या अधिकाधिक क्षणाचा आनंद घेऊ आणि इतरांना देण्यात रमलेले असतात असे सहज जाणवते. तीच त्यांच्या दिलखुलास, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची ओळख असते. स्मिता तळवलकर अगदी अशीच होती.**






**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

मला आठवतंय १९८२ सालच्या सुरुवातीला 'अभिनय' या नाटकाची प्रसार माध्यमातून चर्चा होत होती. बाळ धुरी आणि स्मिता तळवलकर यांच्या प्रमुख भूमिका होत्या आणि दोघांनी रंगभूमीवर अतिशय मोकळेपणाने 'अभिनय' केल्याचे तात्कालिक समिक्षकांनी विशेष कौतुक केले होते. त्यानंतर काही वर्षातच गीतकार शांताराम नांदगावकर यांच्या खार येथील बंगल्यावर त्यांच्या वाढदिवसानिमित्ताच्या पार्टीत आमची पहिली भेट झाली. मी मीडियात काहीसा नवीन आहे हे स्मिता तळवलकरच्या लक्षात आले, पण तिने जणू ते आपल्या लक्षात आले नाही अशा शिताफीने माझ्याशी संवाद ठेवला.

यानंतर स्मिता तळवलकरने अस्मिता चित्र अशी आपली चित्रपट निर्मिती संस्था स्थापन केली आणि कांचन नायक दिग्दर्शित 'कळत नकळत' (१९८९)पासून सातत्याने चित्रपट निर्मिती केली. त्यानंतर आमच्या सातत्याने भेटी होऊ लागल्या.

स्मिता तळवलकरचे खास वैशिष्ट्य म्हणजे तिने सतत काही वेगळ्या विषयावर चित्रपट निर्माण करतानाच त्या कलाकृतींचे व्यावसायिक मूल्य जपले. वेगळ्या भाषेत सांगायचं तर राजदत्त दिग्दर्शित चित्रपटांना लाभणारे पुरस्कार आणि महेश कोठारेच्या चित्रपटांना मिळणारे यश याचा सुवर्णमध्य साधण्यात स्मिता यशस्वी ठरली.

स्मिताला तिच्या दादरमधील कार्यालयात अथवा खारच्या घरी कधीही फोन करावा ती असेल तर काम काय ते नीट समजून घेणार आणि मग ठरल्याप्रमाणे भेटणार. ती नसेल तर आपला निरोप मिळाल्यावर आवर्जून फोन करणार (आजच्या अनेक सेलिब्रिटीजच्या मोबाईलवर आपले नाव जाऊनही रिप्लाय मिळत नाही. बहुतेक नाव वाचूनच तसा निर्णय घेतला जात असावा). स्मिता एक प्रकारे चळवळ्या स्वभावाची होती. आपण हे करायला हवे, आपण ते करू शकतो, आपण अशी नवीन पावले टाकायला हवीत, आपण नवीन आव्हाने स्वीकारायला हवीत असा कमालीचा सकारात्मक दृष्टिकोन आणि उर्जा तिच्यात होती. उसंत अशी ती कधी घ्यायची नाही. आपण वेळेचा सदुपयोग करायला हवा याबाबतची तिची जागरूकता आणि न थकता, न कंटाळता काम करीत राहण्याची तिची प्रवृत्ती अतिशय कौतुकास्पद.

मला आठवतंय कोल्हापूरमध्ये तिची निर्मिती असलेल्या आणि संजय सूरकर दिग्दर्शित 'चौकट राजा' या चित्रपटाच्या शूटिंगची तयारी झाली. सगळे युनिट तिकडे सज्ज झाले आणि अशातच मुंबईवरून परेश रावलचा निरोप आला, मी या चित्रपटात काम करू शकत नाही. मी आता कोल्हापूरला येत नाही. हा अतिशय अनपेक्षित धक्काच होता. अन्य कोणी निर्माता असता तर कोलमडून गेला असता. ऐनवेळी काय करायचं असा प्रश्न निर्माण झाला. दिलीप प्रभावळकर यांनी ही अडचण ओळखली आणि मध्यवर्ती भूमिका साकारण्याची तयारी दाखवली.

स्मिता तळवलकरने 'सवत माझी लाडकी (१९९३) या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. कोल्हापूरमध्येच तिने चित्रीकरण सत्र आयोजित केले आणि मुंबईतील आम्हा सिनेपत्रकारांना शूटिंग रिपोर्टींगसाठी दोन दिवसांचा दौरा आयोजित केला. सेटवर मोहन जोशी, नीना कुलकर्णी, वर्षा उसगावकर आणि प्रशांत दामले असे कलाकार. चित्रपटाची थीम फॅण्टसी. त्यामुळे सेटवरचे वातावरण खेळकर, हलके फुलके ठेवण्याकडे स्मिताने आपला कल ठेवल्याचे जाणवले.

'तू तिथे मी' (१९९८) हा निर्माती म्हणून स्मिता तळवलकरसाठी तर दिग्दर्शक म्हणून संजय सूरकरसाठी अगदी वेगळाच अनुभव होता. याचं कारण त्यांनी वयोवृद्ध कलाकारांना एक गाणे आणि काही प्रसंग यासाठी एकत्र आणले होते. पुणे शहरातील या चित्रपटाच्या सेटवर शूटिंग रिपोर्टींगसाठी मुंबईतील आम्हा सिनेपत्रकारांसाठी आवर्जून आमंत्रित केले. स्मिता मीडिया फ्रेन्डली होती. प्रसारमाध्यमातून आपली कलाकृती जनसामान्यांपर्यंत पोहचते, त्यातूनच प्रेक्षक चित्रपटगृहाकडे येतो याचे स्मिताला असलेले भान विलक्षण होते. एकिकडे असा दृष्टिकोन, तर दुसरीकडे आपला चित्रपट मुंबई असो, पुणे असो, कोल्हापूर असो, कशा पद्धतीने आणि कधी प्रदर्शित करायचा याचे तिचे नियोजन कौतुकास्पद असे. त्या काळात टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत. एखादा चित्रपट अगोदर मुंबईत, तर एखादा पुणे शहरात प्रदर्शित होई आणि मग नाशिक, कोल्हापूर, सांगली, सातारा इतरत्र प्रदर्शित होई. स्मिता तळवलकरने चित्रपट वितरण पद्धत, त्यातील गुंतागुंत, आव्हाने, चित्रपट प्रदर्शकांच्या अपेक्षा या सगळ्याची माहिती मिळवली. आपला चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याची तिची धडपड लक्षात येई. आपण चित्रपट निर्माण केला आता प्रेक्षक काय ते ठरवतील अशी स्मिताची कधीच भावना व भूमिका नव्हती. 'तू तिथे मी' मुंबईत प्लाझा चित्रपटगृहात प्रदर्शित झाला असता अस्मिता चित्रच्या वतीने दादर, माहिम परिसरातील रसिकांसाठी घरपोच तिकीट व्यवस्था सुरू केली. यात तिचा ध्यास दिसतो. भरपूर वाचनातून तिला आपल्या चित्रपटासाठी विषय मिळत.

स्मिताच्या कारकीर्दीची सुरुवात मुंबई दूरदर्शवर मराठी बातम्यांसाठी वृत्तनिवेदिका म्हणून झाली. स्मिता पाटील ही स्मिता तळवलकरची अतिशय आवडती अभिनेत्री, पण दुर्दैवाने १३ डिसेंबर १९८६ रोजी स्मिता पाटीलचे निधन झाले असता ती बातमी वाचताना स्मिता तळवलकरला आपले अश्रू लपवता आले नाहीत. यात तिची संवेदनशीलता दिसते.

स्मिता तळवलकर कारकीर्दीत सतत पुढची पावले टाकणारी. तिने रंगभूमीवर पाऊल टाकले. मग चित्रपट माध्यम व व्यवसायातही पाऊल टाकून आपले अनुभवविश्व व्यापक केले. 'तू सौभाग्यवती हो' (१९८६) हा स्मिताचा पहिला सिनेमा. त्यानंतर 'गडबड घोटाळा' वगैरे चित्रपटात भूमिका केल्यावर तिने निर्मितीच्या क्षेत्रात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. स्वस्थ बसणे हे स्मिताच्या स्वभावात नव्हतेच. कलेच्या क्षेत्रातील विविध वाटा ती स्वीकारत होती. अस्मिता चित्र ही निर्मिती संस्था सुरू केल्यानंतर 'कळत नकळत' (१९८९) या सिनेमाद्वारे स्मिताने निर्मितीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. इतकेच नव्हे तर 'कळत नकळत ' चित्रपटाला राज्य आणि राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त झाल्यावर स्मिताचा हुरुप विलक्षण वाढला.

'घरकुल' या टीव्ही मालिकेची निर्मिती करुन स्मिताने टीव्ही क्षेत्रात पदार्पण केले आणि नंतर अनेक लोकप्रिय आणि आठवणीत राहतील अशा मालिकांची निर्मिती केली.

स्मिताच्या प्रगती पुस्तकातील काही संदर्भ सांगायलाच हवेत. १९८९ कळत नकळत (निर्मिती), १९९१ चौकट राजा (अभिनय, निर्मिती).१९९३ सवत माझी लाडकी (निर्मिती, दिग्दर्शन)१९९८ तू तिथे मी (निर्मिती) २००४ सातच्या आत घरात (निर्मिती), २००६ आनंदाचे झाड (निर्मिती) याशिवाय चेकमेट, टोपी घाला रे, अडगुलं मडगुलं, एक होती वाडी, जन्म, श्यामचे वडील, या गोल गोल डब्यातला, प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं इत्यादी चित्रपटातून भूमिका साकारल्या.

स्मिताने घरकुल, पेशवाई, अवंतिका, ऊनपाऊस, कथा एक आनंदीची, अर्धांगिनी, सुवासिनी, उंच माझा झोका या मालिकांची निर्मिती केली. या प्रवासात तिला बरेच पुरस्कार प्राप्त झाले यात आश्चर्य नव्हतेच, पण तेही यश एन्जॉय केले आणि आपला आपल्या कारकिर्दीवरचा फोकस वाढवला. तेच आपले विश्व आहे, तीच आपली मानसिक व भावनिक गरज आहे असे मानले.

३७वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (१९८९) कळत नकळत–सर्वोत्कृष्ट निर्मिती स्मिता तळवलकर आणि दिग्दर्शिक कांचन नायक यांना संयुक्त पुरस्कार. ४६वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (१९९८) तू तिथे मी–सर्वोत्कृष्ट निर्माती स्मिता तळवलकर आणि दिग्दर्शक संजय सूरकर यांना संयुक्त पुरस्कार. महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार (१९९२) सवत माझी लाडकी–सर्वोत्कृष्ट चित्रपट दुस–या क्रमांकाचा पुरस्कार. स्मिताच्या कार्यकर्तृत्वालाच ही दाद होय. अशी चौफेर आणि सुखद वाटचाल सुरु असतानाच मुंबईतील एका सायं दैनिकात आपल्या अनुभवावर आधारित असे साप्ताहिक सदरही लिहिले. ओघवत्या शैलीमुळे ते वाचनीय आणि लोकप्रियही ठरले. एकदा तिने चित्रपट समीक्षकांवरही बोचरे भाष्य केल्याने काही वाद निर्माण झाला होता.

आपल्या आयुष्यावर, कामावर बेहद्द प्रेम असलेल्या स्मिता तळवलकरला कोल्हापूरला शिरीष राणे दिग्दर्शित 'जन्म'च्या चित्रीकरणात भाग घेत असताना पोटात दुखू लागले. हे दुखणे काही वेगळे आहे याची स्मिताला जाणीव झाली. या चित्रपटाच्याही शूटिंग रिपोर्टींगसाठी मी कोल्हापूरला गेलो असता स्मिता माझ्याही नेहमीप्रमाणेच उत्फूर्तपणे बोलली. तिच्या या दुखण्याचा कोणताच लवलेश जाणवला नाही, पण २०१०मध्ये तिला कॅन्सर असल्याचे निदान झाले. त्यानंतरही ती खचून गेली नाही. याच दरम्यान ती सुबोध भावे व राखी सावंत अशी अगदी विचित्र जोडी जमवून एका मजेशीर मराठी चित्रपट निर्मितीची तयारी करीत होती, पण दुर्धर आजाराशी अगदी निकराने झुंज देताना हा चित्रपट मागे पडला. एकीकडे सातत्याने उपचार घेणाऱ्या स्मिताने आपल्या कामात तसा खंड पडू दिला नाही. अशा या कलासक्त अभिनेत्रीला ६ ऑगस्ट २०१४ रोजी कॅन्सरने जगाच्या रंगभूमीवीणन, रूपेरी पडद्यावरुन कायमचे हिरावून नेले. नो रिहर्सल, नो रिटेक. स्मितानेच निर्मिलेल्या 'चौकट राजा' या चित्रपटातलं 'एक झोका.. चुके काळजाचा ठोका' हे गाणं जसं काळजाला भिडणारं होतं तसंच स्मिता तळवलकरच जाणंही मराठी रसिक आणि मराठी चित्रपटसृष्टीच्या काळजाचा ठोका चुकवणारं असंच ठरलं.

स्मिता तळवलकरने आपल्या चतुरस्त्र कामगिरीने एक काळ गाजवला. 'चौकट राजा' या चित्रपटामुळे १९९१ हे वर्ष स्मितासाठी सर्वांत खास ठरलं. हा चित्रपट गतिमंद मुलाच्या आयुष्यावर बेतलेला होता. स्मिताच्या 'दिल के करीब' होता. त्यात स्मिता भावनिकदृष्ट्या खूपच गुंतलेली होती. मुंबई महापालिकेच्या स्वच्छता मोहिमेवर बेतलेल्या एका डॉक्युमेंटरीचीही तिने निर्मिती केली. भारतरत्न सचिन तेंडुलकरने या डॉक्युमेंटरीतून संदेश दिला होता. स्मिताने एवढ्यावरच न थांबता 'अस्मिता चित्र अकादमी' स्थापन करून नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध करुन दिले. मनोरंजन क्षेत्राला चहुबाजूने गुंतवून घेतलेले व्यक्तिमत्त्व म्हणून स्मिता तळवलकरचे नाव अग्रस्थानी निश्चित हवे.

स्मिता तळवलकरच्या निधनाच्या दिवशी एका मराठी वृत्तवाहिनीने तिच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेणारा शो करायचं ठरवलं आणि त्यात मलाही स्मिताच्या काही प्रत्यक्ष अनुभवाच्या आठवणी सांगायच्या होत्या. मी त्याच चॅनेलच्या ऑफिसमध्ये लिफ्टने जात असताना त्याच चॅनेलमधील दोघींची चर्चा कानावर आली. आज पहिल्यांदाच मी या कलाकारांना वाईट वाटल्याचं पाहिलं. हो गं या कलाकार मंडळींच्या डोळ्यांत अश्रू तेही खरे अश्रू ही दुर्मिळ गोष्ट गं, पण आज दिसले. हे ऐकताना कलाकारही हाडामासाची, भावभावनांची माणसचं असतात याचा यांना विसर पडतोय असं म्हणायचं की आणखी काही समजायचं हेच मला समजत नव्हते. मी मात्र तेच लक्षात ठेवून स्मिताला श्रद्धांजली अर्पण केली.

---

## नवसंकल्पनांना चालना देण्यासाठी महाराष्ट्र

# स्टुडन्ट इनोव्हेशन चॅलेंज

राज्यातील सर्व जिल्ह्यातील विद्यार्थी नवउद्योजक व त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा शोध घेऊन त्यांना आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच या नवउद्योजकांना प्रोत्साहन, तज्ज्ञ मार्गदर्शन, निधी व आवश्यक पाठबळ पुरवणे या उद्देशाने जिल्ह्यात राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचे अनावरण १५ जुलै २०२३ रोजी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते करण्यात आले

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी राज्यातील कोणत्याही महाविद्यालय अथवा औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी/विद्यार्थिनी किंवा जास्तीत जास्त तीन विद्यार्थ्यांचा समूह पात्र असेल तसेच अर्ज करण्यासाठी विद्यार्थी/विद्यार्थिनी समूहाकडे नाविन्यपूर्ण संकल्पना असणे आवश्यक आहे. हा उपक्रम तीन टप्प्यात आयोजित करण्यात येणार असून प्रथम टप्प्यात राज्यातील महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इतर शैक्षणिक संस्थांची नोंदणी करण्यात येत आहे. तद्नंतर त्या संस्थेतील विद्यार्थी स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजमध्ये आपल्या नवसंकल्पनांचे अर्ज करू शकतील. संस्थास्तरावर उत्तम दोन संकल्पनांची निवडही प्रथम टप्यात करण्यात येईल.

या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्यात जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झालेल्या उत्तम दोन संकल्पनांमधून, सर्वोत्कृष्ट १०० संकल्पनांची जिल्हास्तरीय सादरीकरणासाठी निवड करण्यात येईल. निवडलेल्या १०० नवउद्योजकांसाठी विशेष एकदिवसीय मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यातील सादरीकरण सत्रातून सर्वोत्कृष्ट १० विजेते निवडले जातील. सर्वोत्कृष्ट १० विजेत्यांमध्ये, ३० टक्के महिला ५० टक्के औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे विद्यार्थी व One District One Product (ODOP) संबंधित नवसंकल्पनांना प्राधान्य असेल. जिल्हास्तरीय विजेत्यांना प्रत्येकी एक लाख रुपये बीज भांडवल देण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यातील १० अशा एकूण ३६० नवउद्योजकांना १२ महिन्यांचा विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम दिला जाणार असून इन्क्युबेशन प्रोग्रामनंतर या ३६० नवसंकल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण करण्यात येणार असून यातून सर्वोत्कृष्ट १० नवउद्योजकांना प्रत्येकी ५ लाख रुपयांचे बीज भांडवल देण्यात येणार आहे. या उपक्रमाची विशेष बाब म्हणजे शैक्षणिक संस्था व जिल्ह्यांना या उपक्रमाची व्याप्ती वाढवून राज्याची नावीन्यपूर्ण परिसंस्था बळकट करण्यासाठी विशेष परितोषिकेही दिले जाणार आहेत. या उपक्रमाच्या अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या अधिकृत संकेतस्थळ www.msins.in अथवा स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या www.schemes.msins.in या पोर्टलला भेट द्यावी. या संबंधी अधिक मार्गदर्शनासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड–अलिबाग येथे दूरध्वनी क्रमांक ०२१४१–२२२०२७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

या उपक्रमात रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त शैक्षणिक संस्था व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आपल्या नवसंकल्पना मांडाव्यात असे आवाहन, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता पवार यांनी केले आहे.

**–मनीषा पिंगळे,**
जिल्हा माहिती अधिकारी,
रायगड–अलिबाग




---

## लोकांना विकासात्मक प्रशासन देण्याची जबाबदारी असलेला

# महसूल विभाग

महसूल अधिकारी हा प्रशासनाचा कणा असून शासन व जनतेमधील महत्त्वाचा दुवा आहे. महसूल विभागाची नाळ शेती व शेतकऱ्यांशी जोडली आहे. जमिनीच्या विविध प्रकरणाशी निगडीत असलेल्या प्रश्नांचा ज्याच्याशी संबंध येतो, तो महसूल विभाग होय लोकांना विकासात्मक प्रशासन देण्याची जबाबदारी महसूल विभागाची आहे. त्यामुळे सामान्य लोकांच्या महसूल विभागाकडून खूप अपेक्षा आहेत. महसूल विभागात काम करताना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लोकाभिमुख काम करण्याकडे कल वाढवावा याकरिता महाराष्ट्र शासन महसूल विभाग व वन विभाग यांच्या वतीने १ ते ७ ऑगस्ट यादरम्यान महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने कोकण विभागाचे आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात महसूल सप्ताहनिमित्त विविध कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. महसूल विभागामार्फत ज्या विविध सेवा सर्वसामान्या जनतेला दिल्या जातात त्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी व शासनाबद्दल व शासनाच्या कामांबद्दल नागरिकांचा विश्वास वृध्दिंगत व्हावा या उद्देशाने महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

महसूल सप्ताह अंतर्गत १ ऑगस्ट रोजी कोकण भवनातील सभागृहात आयोजित 'जगणं सुंदर आहे' या विषयावर शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांचे सुंदर असे व्याख्यान कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. कल्याणकर म्हणाले की, या सप्ताहात संपूर्ण कोकणातील सर्व सात–बारा आणि मालमत्ता हस्तांतरणांवर घरातील महिलांची नांवे नोंदणी करणार आहेत. कोकणातील आदिवासीबहूल जिल्ह्यांमध्ये कातकरी उत्थानाचे काम करण्यात येणार आहे. नैसर्गिक आपत्तीत नागरिकांना मिळणारी नुकसान भरपाई, महसूल अदालतीमधील प्रलंबित प्रकरणे, सलोखा योजना, जमिनी विषयक वाद, आपले सरकार या पोर्टलवर प्राप्त तक्रारींचा निपटारा, शहिदांच्या कुटूंबीयांना मदत, त्यांना जमिन वाटप, महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित बाबी निकाली काढण्यात येणार आहेत.

महसूल सप्ताहाच्या माध्यमातून महसूल विभाग आणि जनतेतील निर्माण झालेली दरी कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार असून या सप्ताहा दरम्यान होणारे काम सप्ताह संपल्यानंतरही पुढे असेच चालू राहणार असल्याची माहिती डॉ. कल्याणकर यांनी दिली. कार्यक्रमाच्या शेवटी उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार विभागीय आयुक्तांच्या हस्ते करण्यात आला.

सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी युवा संवाद उपक्रमाला नागरिकांसह विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविला गेला. मुंबई उपनगर जिल्ह्यातील बांद्रा पूर्व येथील चेतना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आयुक्त डॉ. कल्याणकर यांनी युवा संवादाचे महत्त्व सांगितले. पालघर जिल्ह्यातील सोनोपंत दांडेकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महसूल विभागाच्या दूत आणि तज्ञांमार्फत मार्गदर्शन करण्यात आले. डहाणू महाविद्यालयात के. एल. पोंदा कनिष्ठ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल ॲण्ड कॉलेज, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सांगुळवाडी वैभववाडी कृषी विद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सिंधुदूर्ग जिल्हयातील नागरिकांना जातीच्या दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

विभागीय आयुक्तांनी हा महसूल सप्ताह यशस्वी करण्यासाठी विभागात पुढील दिवसांत विविध उपक्रम राबविण्याचे आदेश दिले आहेत. यात ३ ऑगस्ट रोजी अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ, भूस्खलन, अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तीत नागरिकांना मिळणारी नुकसानभरपाई, अशा परिस्थितीत घ्यावयाची काळजी या विषयांवर आधारीत एक हात मदतीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ४ ऑगस्ट रोजी महसूल अदालीतींमधील प्रलंबित प्रकरणे, सलोखा योजना, जमिनी विषयक वाद, आपले सरकार या पोर्टलवर प्राप्त तक्रारींचा निपटारा अशा विषयांशी संबंधित जनसंवाद या कार्यक्रमाचे आयोजन. ५ ऑगस्ट रोजी सीमेवर तैनात सैनिक तसेच शहिदांच्या कुटूंबीयांना मदत, त्यांना जमीन वाटप, संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांचे महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी सैनिक हो तुमच्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन. ६ ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित बाबी निकाली काढण्यासाठी महसूल संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांशी संवाद हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. ७ ऑगस्ट रोजी महसूल सप्ताहा दरम्यान केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेण्यासाठी महसूल सप्ताह सांगता समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमांचे नियोजन करून याबाबतची प्रचार व प्रसिद्धी करण्याबरोबरच महसूल विभाग, भूमी अभिलेख आणि नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्यामार्फत शासकीय योजनांची माहिती विशद करणाऱ्या लघु चित्रफिती तयार करून विविध प्रसारमाध्यमांमध्ये देण्यात येणार आहेत. याशिवाय प्रत्येक जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार कार्यालयांमध्ये हेल्पडेस्क, हेल्पलाईन तयार करून मदत करण्याकरिता यंत्रणा कक्ष करण्यात येणार आहे.

कोकण विभागात हा महसूल सप्ताह यशस्वीरीत्या पार पाडण्याकरिता उपायुक्त दर्जाच्या नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई शहरसाठी उपायुक्त (महसूल) कोकण विभाग विवेक गायकवाड, मुंबई उपनगरसाठी उपायुक्त (रोहयो) कोकण विभाग अजित साखरे, ठाण्यासाठी उपायुक्त (सामान्य प्रशासन) कोकण विभाग मनोज रानडे, पालघरसाठी उपायुक्त (पुरवठा) कोकण विभाग लिलाधर दुफारे, रायगडसाठी उपायुक्त (पुनर्वसन) कोकण विभाग रिता मैत्रेवार, रत्नागिरीसाठी उपआयुक्त (नगरपालिका) कोकण विभाग रवींद्र जाधव, सिंधुदूर्गसाठी उपायुक्त (विकास आस्थापना) कोकण विभाग मिनल कुटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महसूल सप्ताहादरम्यान शासनाचे महत्वाचे कायदे, विकास योजना, उपक्रमांना प्रसिध्दी देण्यासाठी सखोल माहिती असलेल्या तज्ञांच्या मुलाखती तसेच व्याख्यानाचे प्रक्षेपण स्थानिक वृत्तवाहिन्यांवर करण्यात येईल. महसूल विभागामार्फत देण्यात येणारे विविध दाखले आणि प्रमाणपत्रे, त्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रांबाबतची माहितीपत्रके तयार करून नागरिकांना देण्यात येणार आहेत. या महसूल सप्ताहात महसूल विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शासनामार्फत करण्यात आले आहे. तेव्हा चला तर महसूल सप्ताहाचा आपण लाभ घेऊया!

**–संजिवनी जाधव–पाटील,**
सहाय्यक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय,
कोकण भवन, नवी मुंबई

# पनवेल परिसरातील शाळा, महाविद्यालयांत विविध उपक्रम

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात बाह्यतज्ज्ञ मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात गुरुकुल विभागा अंतर्गत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने विविध उपक्रम राबविले जातात. त्या अनुषंगाने आज शुक्रवारी (दि. ४) विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढण्यासाठी, विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी यासाठी अगस्ती सायन्स सेंटरच्या वतीने रेश्मा सोमवन्शी व वैशाली खोकर्ले मॅडम हे बाह्यतज्ञ बोलाविण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक कुतूहल वाढावे आणि त्यांनी स्वनिर्मितीचा अनुभव घ्यावा यासाठी विज्ञानाच्या कृतीपत्रिका असणाऱ्या पुस्तकांचे मोफत वाटप सर्व विद्यार्थ्यांना केले.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने बहुमोल असणाऱ्या या त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे, रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, विज्ञान विषयाच्या शिक्षिका व्ही. व्ही. गावंड यांनी या दोन्ही बाह्य तज्ञ मार्गदर्शकांचे आभार व्यक्त केले.

## सीकेटी महाविद्यालयात अतिथी व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) येथे बँकिंग क्षेत्रात करियर ची संधी याविषयी अतिथी व्याख्यानाचे शुक्रवारी (दि. ४) सी. डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजन करण्यात आले होते.

या सत्राला केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे माजी उपायुक्त आणि करियर मार्गदर्शक सुहास पाटील यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. त्याचप्रमाणे सी. डी. देशमुख केंद्राचे समन्वयक विजयेंद्र शितोळे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरक असे व्याख्यान केले. वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ बी. डी. आघाव यांची उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे सी. डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे अध्यक्ष डॉ. जे. एम. पावरा,वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. एस. बी. यादव, अर्थशास्त्र विभागाचे प्रा. हरिभाऊ थोरात, इतिहास विभागाचे प्रा. भावेश भोईर आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या लिपिक मनाली परब यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले आणि आभार सी. डी. देशमुख केंद्राचे समन्वयक विजयेंद्र शितोळे यांनी मानले.



## गव्हाण विद्यालयात बालवैज्ञानिकांचा गौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशनच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये झालेल्या सायन्स टॅलेंट रिसर्च स्पर्धेमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी हिरीहिरीने भाग घेवून यश संपादन केले. त्यातील यशस्वी विद्यार्थी वेद कल्पेश घरत, प्रतीक्षा ज्ञानेश्वर कोळी, वेदश्री श्रीधर पाटील, सृष्टी सागर तांडेल यांना बुद्धीमान व होतकरू बाल वैज्ञानिकांचा सत्कार करून विद्यालयाच्या वतीने शनिवारी त्यांना गौरविण्यात आले.

विद्यालयाच्या पर्यवेक्षिका विशाखा मोहिते तसेच विज्ञान शिक्षिका चित्रलेखा पाटील, योगिता पाटील व गुरुकुल प्रमुख संदीप भोईर आदींच्या हस्ते या यशस्वी बालवैज्ञानिकांचा गौरव करण्यात आला. या वेळी क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, यु.ए.म्हात्रे, जे.एच.माळी, सुजाता शेलार - चौधरी, अपर्णा देवकुळे, वृषाली म्हात्रे, द्रौपदी वर्तक, चारूशीला ठाकूर, संपदा म्हात्रे, प्रणाली पाटील आदी अध्यापक,अध्यापिका व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन हर्षला पाटील यांनी केले.

## रिटघर हायस्कूलमध्ये वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विदयालय व श्री. रामशेठ ठाकूर उच्चमाध्यमिक विद्यालय, रिटघर मध्ये हरित सेना अंतर्गत माध्यमिक विद्यालयाच्या परिसरात शाळेचे मुख्याध्यापक बी. बी. साळुंखे आणि हरित सेनाप्रमुख श्री. भोईर व सर्व सेवकवृंद यांच्या हस्ते अतिशय उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले.

शालेयनियोजन नुसार विदयार्थ्यांकडून सोनचाफा, रातराणी, वड, पिंपळ, निलगिरी, गुलमोहर, कडूनिंब, गुलाब, मोगरा, इ. अनेक प्रकारची झाडे लावली. त्या झाडांच्या संगोपनाच्या दृष्टीने बांबू लावून चारही बाजूस संरक्षक म्हणून कापड लावण्यात आले. तसेच पाचवी ते बारावीच्या वर्गशिक्षकांना इयत्तावार विद्यार्थ्यांच्या गटानुसार झाडाच्या संवर्धनाची जबाबदारी देण्यात आली.



## कॅनरा बँकेतर्फे विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे दि. बा. पाटील विद्यालय कामोठे मधील मागील वर्षी एस. सी. व एस. टी. संवर्गातील इयत्ता पाचवी ते दहावी वर्गातील प्रथम विद्यार्थिनींना कामोठे शाखेतील कॅनरा बँकेकडून त्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक स्वरूपात शिष्यवृत्ती देण्यात आली.

यामध्ये आठवी ते दहावी वर्गासाठी पाच हजार रुपये आणि पाचवी ते सातवी वर्गासाठी अडीच हजार रुपये आर्थिक मदत देण्यात आली. विद्यालयातील जान्हवी संदीप जाधव, कल्याणी राहुल सुपनेरे, सायली कदम, समृद्धी चव्हाण, समीक्षा मंगेश खिलारे या विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचा धनादेश देण्यात आला.

कॅनरा बँकेच्या या सुप्त उपक्रमासाठी विद्यालयाचे चेअरमन जयदास गोवारी, मुख्याध्यापक एस.टी. चाळके यांनी बँकेचे मॅनेजर मेहंदी हसन व ऑफिसर रश्मी चिरेकर यांचे आभार मानले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्फे अभ्यासक्रम नोंदणी सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. ५) वाणिज्य विभागातर्फे नॅशनल प्रोग्राम फॉर टेक्निकल इंहान्सड लर्निंग अभ्यासक्रमांचे नोंदणी सत्र घेण्यात आले. या ऑनलाइन अभ्यासक्रमांमध्ये प्रामुख्याने ४ आठवडे, ८ आठवडे, १२ आठवडे अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे.



या अभ्यासक्रमांसाठी वाणिज्य शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील सुमारे २०० विद्यार्थी व विद्यार्थिनीनी व सहा प्राध्यापकांनी वेगवेगळ्या अभ्यासक्रमासाठी नोंदणी केली त्याचबरोबर विद्यार्थी व प्राध्यापकांनी हे सर्व अभ्यासक्रम शिकून झाल्यावर त्यावर एक परीक्षा ऑनलाईन प्रणालीद्वारे घेतली जाईल तसेच परीक्षा पास झाल्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या रँकिंग विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना प्रमाणपत्राच्या माध्यमातून देण्यात येतील.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व प्रा. डॉ. नीलम लोहकरे (समन्वयक, एनपीटीईल अभ्यासक्रम समिती) यांनी वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना या ऑनलाइन अभ्यासक्रमांसाठी नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहन दिले व मार्गदर्शन केले. या सत्राचे आयोजन वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. नम्रता पारीक यांनी केले तसेच प्रा. राहुल कांबळे प्रा. डॉ. महादेव चव्हाण प्रा. डॉ. कविता शिंदे प्रा. शिल्पा पाटील प्रा. डॉ. फारुख शेख यांनी सहकार्य केले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांचे सामाजिक उपक्रमांनी अभीष्टचिंतन

## गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलच्या प्रभाग क्रमांक १७ मधील पनवेल रेल्वे स्टेशन रोड नर्मदा कॉम्प्लेक्स येथील श्री गुरुलिंगेश्वर मराठी प्रायमरी शाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यासोबतच विद्यार्थ्यांना नाश्ता देण्यात आला.

भाजप युवा कार्यकर्ते राजू बगाटे, भाजप उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका उपाध्यक्ष व बुथ कमिटी ४२८चे अध्यक्ष रावसाहेब खरात, मुख्याध्यापक शिलवंत प्रविण सर, शिक्षक देवव्रत चाफेसर, अंकिता पिंगळे, श्री. पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या वेळी भाजप कार्यकर्ते दिपक वाहुळकर, राजू झिरे, सर्जेराव साळवे, अमोल लहाने, गणेश जाधव, प्रकाश बोरुडे, राजू जाधव, अनिकेत खरात, रशीद काझी शेख आणि तथागत मित्र मंडळाचे कार्यकर्ते, बुथ कमिटी अध्यक्ष आनंद जाधव आदी उपस्थित होते.



## खारघरमध्ये विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त केलेल्या आवाहनानुसार साधना अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भरडधान्य वर्षाचे औचित्य साधून खारघर तळोजा महिला मोर्चाच्या टीमने सेक्टर १२ येथील अनाथ आश्रमात भरड धान्यापासून बनवलेले पदार्थांचे वाटप केले.

यासोबतच उत्तराखंड समाजातील काही महिला सोबत वृक्षारोपण कार्यक्रम साजरा केला तसेच भरड धान्याच्या भाकरी बनवून त्याचा व्यवसाय करणाऱ्या माधुरी कांबळे यांचा सत्कारही या वेळी करण्यात आला.



या वेळी भाजप खारघर शहर सरचिटणीस दीपक शिंदे यांनी मार्गदर्शन केले. माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, अध्यक्ष साधना पवार यांनी सर्व महिला मोर्चातर्फे आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया सदस्य मोना अडवाणी यांनी मुलांसाठी फळांचे वाटप केले. गीता चौधरी जिल्हा चिटणीस यांनी महिलांना रोप भेट देऊन आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी चिटणीस अंकिता वारंग, माजी सैनिक सेल अध्यक्ष निर्मला यादव, सोशल मीडिया सहसंयोजिका कंचन बिर्ला, अनुसूचित जाती जिल्हा सदस्य सीमा खडसे, सुशीला शर्मा, अश्विनी भुवड, प्रिया दळवी, स्मिता आचार्य, मीनाक्षी अंथवाल, शकुंतला नेगी, नंदा पानसरे, नूतन सिंग, दुर्गा देवी या महिला कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

## अॅड. वृषाली वाघमारे यांच्याकडून विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त केलेल्या आवाहनानुसार पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका अॅड. वृषाली वाघमारे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

नवीन पनवेल सेक्टर १३ कालिका माता हॉल या ठिकाणी विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, अॅड. वृषाली वाघमारे, प्रभाग १७चे वॉर्ड अध्यक्ष विजय म्हात्रे, अॅड. जितेंद्र वाघमारे, योगेश हाडगे, जय बजरंग मित्र मंडळाचे अध्यक्ष विनोद वाघमारे, जय बजरंग महिला मंडळाच्या अध्यक्ष हेमांगी वाघमारे, मयुरी उनाटकर, व सदस्य उपस्थित होत्या.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-18/23-24/ **RFx No. 7000028065** | Supply of Different Types of Clamps & Connectors along with Nut Bolts at 400 kV Substation Nagothane under 400 kV RS (O&M) Division, Nagothane under EHV O&M Circle, Panvel. | Rs. 4,98,855.89 | 12.08.2023 up to 10:00 Hrs |

**EMD:** Rs. 5,000/- for Sr. No. 1 & **Tender Fee:** Rs. 500/- + GST For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635
Email ID: **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**


5 ऑगस्ट
वारसा लोकहिताचा, चेहरा नव्या पिढीचा..!
लोकप्रिय आमदार
मा. श्री.
पनवेल विधानसभा
प्रशांत ठाकूर
आपणांस या जन्मदिनी
उदंड आयुष्याच्या
अनंत शुभेच्छा !!
TIPL
शु भे च्छु क
ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लि.
an ISO 9001-2015 Certified Company
GROWING STRONG, BONDING STRONGER
Registered office : 1st floor, Om Sadnika, Plot No. 265/1, Panvel-Uran Road, Panvel, Navi Mumbai- 410206.
Tel. : 022 27452713, 9769409120
Email : thakurinfraprojects@gmail.com
Web : www.thakurinfraprojects.in

## निवडक



### विद्यार्थ्यांना साहित्य, खाऊवाटप

**मुरूड :** रायगड जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले व हिराबाई मनोहर बैले यांची नात राशी धीरज कोळी हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुरूड नगर परिषद शाळा क्रमांक १मधील इयत्ता पहिली ते सातवीमधील विद्यार्थी व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला नवापाडा कोळी समाजाचे अध्यक्ष यशवंत सवाई, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष जागृती जठारी व मनोहर बैले यांचा परिवार उपस्थित होता. या वेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सील पट्टी, शॉपनर यासह चॉकलेट तसेच बिस्किटच्या पुड्यांचे वाटप करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त करून राशीला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

### कर्जत रोटरी क्लबला १० पुरस्कार




**कर्जत :** रोटरी डिस्ट्रीक्ट तसेच रोटरी इंटरनॅशनलकडून कर्जतच्या रोटरी क्लब कार्याची दखल घेत अध्यक्ष सतीश श्रीखंडे यांना बेस्ट प्रेसिडेंट व पाच स्टार प्रेसिडेंटसह कर्जत रोटरी क्लबला १० पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कर्जत रोटरी क्लबच्या २१ वर्षांच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडले आहे. रोटरी डिस्ट्रीक्ट सन्मान सोहळा २०२२-२३चे आयोजन डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. अनील परमार यांच्या मार्गदर्शनाखाली रोटरी इंटरनॅशनलचे डायरेक्टर ए. एस. व्यंकटेश, डॉ. महेश कोटबागी, प्रांतपाल मंजू फडके, डॉ. गिरिश गुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सन्मान सोहळ्याला १४६ क्लबचे अध्यक्ष कर्जत क्लब सचीव विशाल शहा, आयपीपी सुनील सोनी, पब्लिक इमेज डायरेक्टर सचिन ओसवाल, मेडिकल डायरेक्टर डॉ. प्रेमचंद जैन आदी उपस्थित होते.

### नांदगाव विद्यालयात गणवेश, वह्यावाटप



**पाली :** संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव मधील विद्यार्थ्यांना द लाईफ फाउंडेशन, बल्लाळेश्वर देवस्थान पाली आणि स्काईज अँड रे इक्विटीज लिमिटेड यांच्या वतीने गणवेश आणि वह्या देण्यात आले. त्याचे वाटप पाली नगरसेवक सुमेध खैरे यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या वतीने आभार व्यक्त केले. या वेळी नगरसेवक सुमेध खैरे, प्राचार्य संभाजी ढोपे, शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक शिंदे तर आभार बबन पालवे यांनी केले.

### 'अदानी'तर्फे विद्यार्थ्यांना बक्षीस



**मुरूड :** अदानी फाउंडेशन माध्यमातून अब्दुल सत्तार अंतुले महाविद्यालय येथे दहावी आणि बारावीच्या परीक्षेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय स्थान प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय तटरक्षक दलाचे असिस्टंट कमांडंट अनुराग शुक्ला, दिघी पोर्टचे प्रशांत पाटील, तालुका शिक्षण केंद्रप्रमुख नारायण खोपटकर, अब्दुल सत्तार अंतुले महाविद्यालय सभापती अनंत मेंदडकर, मुख्याध्यापक प्रशांत वाणी, शिक्षकवृंद, शाळा समिती सदस्य, अदानी फाउंडेशन वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे, विद्यार्थी आणि पालक वर्ग उपस्थित होते.

### लोकमान्य टिळकांना अभिवादन

**रेवदंडा :** प्रभाकर पाटील सांस्कृतिक कला मंचातर्फे प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय रामनारायण सभागृहात लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंचाचे अध्यक्ष सखाराम पवार यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुळकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक, नाट्यकर्मी शरद कोरडे, चारुशीला कोरडे, माजी नगरसेवक बाळुशेठ पवार, कोमसाप अलिबाग शाखेचे सहकार्यवाह नंदु तळकर, माजी नगरसेवक आर. के. घरत, श्रीधर पाटील, जिल्हा रुग्णालय रक्तपेढीचे हेमकांत सोनार आदी उपस्थित होते.



# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक उपक्रम



**अलिबाग : भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील थळ जिल्हा परिषद विभागामधील रायगड जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी येथे कॉम्प्युटर सीपीयू व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. भाजपचे सोशल मीडिया प्रमुख पंकज प्रवीण अंजारा आणि महिला मोर्चा सरचिटणीस अलिबाग तालुका जान्हवी पारेख अंजारा यांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले.**



**अलिबाग : भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खारेपाट येथे भाजपचे विभागीय अध्यक्ष गोविंद पाटील, कुरकुंडीचे सदस्य शैलेश पाटील यांच्या हस्ते अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले.**



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष अलिबाग तालुकातर्फे भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शहाबाज येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

भारतीय जनता पार्टीचे दक्षिण रायगड जिल्हा चिटणीस समीर राणे, सांस्कृतिक प्रकोष्ट जिल्हा अध्यक्ष केदार आठवले,अलिबाग तालुका सरचिटणीस प्रशांत पाटील, अलिबाग तालुका चिटणीस अमित पाटील, अलिबाग तालुका युवा मोर्चा अध्यक्ष आलाप अशोक मढवी, चरी ग्रामपंचायत सदस्य रोहित जाधव, कुर्डुस युवा मोर्चा विभाग अध्यक्ष रवींद्र म्हात्रे, अलिबाग तालुका सरचिटणीस युवा मोर्चा निखिल चव्हाण, तालुका चिटणीस मयुरेश म्हात्रे, रामराज विभाग अध्यक्ष अजिंक्य पाटील, मेढेखरचे उमेश पाटील, महिला मोर्चा अलिबाग तालुका अध्यक्ष मनीषा पाटील, महिला मोर्चा चिटणीस संध्या शेळके या वेळी उपस्थित होते.



**मुरूड : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व रायगड जिल्हा कार्यकारणी सदस्य आण्णा कंधारे यांनी भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्ताने ओंकार विद्या मंदिर मुरूड येथील शालेय विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली ते चौथीमधील सुमारे ८५ शालेय विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वह्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे मुरूड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे, मुरूड शहर अध्यक्ष उमेश माळी, तालुका उपाध्यक्ष बाळा भगत, ॲड. अभिजित पानवलकर, संघटक सचिव प्रवीण बैकर, सुधीर पाटील, किशोर म्हसळकर, नंदकुमार पाचंगे आदी उपस्थित होते.

या वेळी आण्णा कंधारे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांनी जनतेसाठी जी लोकाभिमुख कामे केली आहेत. त्यामुळे ते नेहमीच लोकांच्या मनातली आवडते नेते राहतील, असा विश्वाससुद्धा भाजप कार्यकर्त्यांनी या वेळी व्यक्त केला.

**खालापूर : प्रतिनिधी**

भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ५ ऑगस्ट वाढदिवसानिमित्त भाजपने खोपोली शहरातील महात्मा गांधी नगर परिषद शाळा क्रमांक ११ शिळफाटा येथील १२० विद्यार्थ्यांना रेनकोट भेट म्हणून वाटप करण्यात आले.

सध्या सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना पावसात भिजत येण्याशिवाई पर्याय नव्हता, तर काही विद्यार्थी शाळेत येऊ शकत नव्हते. त्यामुळे भाजपचे युवा नेते राहुल जाधव, शहर चिटणीस गोपाळ बावस्कर, वैद्यकीय सेलचे सह संयोजक विकास खुरपडे, शक्ती केंद्र प्रमुख संजय म्हात्रे यांच्या विशेष प्रयत्नातून या विद्यार्थ्यांना रेनकोटची भेट आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवसानिमित्त देण्यात आली.

या सेवा कार्याचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत भारतीय जनता पक्ष खोपोली शहराचा वतीने या सर्व विद्यार्थ्यांना मिठाईचेदेखील वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक स्वाती विकास खुरपडे यांनी केले. भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील यांनी दानशूर लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचा राजकीय, शैक्षणिक व सामाजिक वारसा आमदार प्रशांत ठाकूर कशा पद्धतीने पुढे चालवत आहेत या संदर्भात माहिती दिली. खोपोली शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सेवा कार्याच्या कर्यक्रमध्ये सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, माथाडीचे रामभाऊ पवार, युवा मोर्चा अध्यक्ष अजय इंगुळकर, देवेंद्र पाटील, सुनील नंदे, निकेत पाटील, डॉ. नागरगोजे, महिला मोर्चा अध्यक्षा शोभा काटे, सरचिटणीस अश्विनी अत्रे, उपाध्यक्षा अपर्णा साठे, जिल्हा कोषाध्यक्ष रसिका शेट्टे, चिटणीस गीता मोहिते, सुप्रिया नांदे, सागर काटे या व सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना रेनकोट आणि मिठाईचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षिका समीक्षा धानिवले, अश्विनी बिरादार, शाळेचे विद्यार्थी कर्मचारी उपस्थित होते. शिक्षक गोरखनाथ सानप यांनी कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार मानले.





**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पी. यन. पी. तळाघर हायस्कूलमध्ये भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रोहा तालुका भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून शनिवारी (दि. ५) रोजी मुलांना दप्तर व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

या वेळी दक्षिण रायगड भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमित घाग, पी. यन. पी. तळाघर हायस्कूलचे चेअरमन विठ्ठल मोरे, भाजप धाटाव विभाग अध्यक्ष कृष्णा बामणे, भाजपा युवा कार्यकर्ते रोशन चाफेकर, विद्यार्थी आघाडी संपर्क प्रमुख वैभव कुलकर्णी, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस श्रद्धा घाग, महिला कार्यकर्त्या रिया कासार, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, सुमित जंगम, नरहरी घरजाले, राकेश चाफेकर, महेश बामणे, विकास बामणे, धिरज मोंढे, संकेत मोरे, बंटी मोहिते, संयाजी काबंळे यासह शाळेचे माजी विद्यार्थी अविनाश भगत, संकेत काबंळे, शाळेचे मुख्याध्यापक सागर शिंदे, नंदकुमार पाटील, ललित पाटील, वैभव मुंढे हायस्कूलचे कर्मचारी समीर खरीवले, परशुराम कांबळे भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते, शाळेचे विद्यार्थी, पालकवर्ग उपस्थित होता.

## धाकटा खांदा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, ज्येष्ठ नागरिकांना छत्रीचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रत्नदीप स्पोर्ट्स क्लबच्या वतीने विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्रीवाटप कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि. ५) धाकटा खांदा येथील श्री गणेश विद्या मंदिर प्राथमिक शाळा क्रमांक ६ येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्रीचे वाटप करण्यात आले. माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेविका अलका भगत, कामगार सेना अध्यक्ष मोतीलाल कोळी, भाजप जिल्हा कार्यकारिणी सदस्य भीमराव पोवार, युवा नेते सतीश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.





## पनवेलमधील दि. बा. पाटील शाळेत शैक्षणिक साहित्य आणि छत्रीवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल शहरातील महापालिकेच्या दि.बा.पाटील विद्यालयात भाजप युवा नेते केदार भगत यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य आणि छत्रीवाटपाचा कार्यक्रम शनिवारी (दि. ५) आयोजित करण्यात आला होता. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे, तर शिक्षिकांना छत्रीचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, विधानसभा निवडणूक प्रमुख नितीन नितीन पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शन भोईर, भाजप नेते नंदू पटवर्धन, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, आयोजक केदार भगत, केशवस्मृती पतसंस्थेचे चेअरमन अमित ओझे, महिला मोर्चाच्या सपना पाटील, अंजली इनामदार, चंद्रकांत मंजुळे, नीता मंजुळे, इक्बाल काझी, संजय कदम, विशाल सावंत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या.



